# <u>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**
**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :- १८८/२०२३/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. विठठल बाबूराव काळे<br>रा. २५६/१/१ जुना गुळवंच रोड,<br>कानडे मळा, मु.पो.<br>ता.सिन्नर, जि. नाशिक | तहसीलदार,<br>तहसील कार्यालय,<br>सिन्नर, ता.सिन्नर,<br>जि. नाशिक |

**<u>सुनावणी दिनांक १४/१२/२०२३</u>**

तक्रारदार यांनी दिनांक २२/०२/२०२३ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक १४/१२/२०२३ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक २२/०२/२०२३ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार आजपावेतो माहिती उपलब्ध करून दिली नाही.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. २१४७/२०२१/नाशिक संदर्भात दिनांक १५/०९/२०२२ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८)क अन्वये तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर यांना जन माहिती अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत आहे. त्यांनी आदेश प्राप्तीच्या ३० दिवसांच्या आत पथक गठीत करुन सदर माहितीचा पुन्हा एकदा शोध घेऊन, माहिती आढळ झाल्यास अपिलार्थीस माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. माहिती प्राप्त न झाल्यास त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या कायद्यानवये अभिलेख गहाळ प्रकरणी संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर कार्यवाहीबाबत आवश्यक प्रस्ताव आदेश प्राप्तीच्या ३० दिवसांच्या आत सक्षम प्राधिकारी यांना सादर करुन त्याची एक प्रत अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

४) सुनावणीपूर्वी प्रस्तुतच्या तक्रार अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल अद्यापही आयोगास प्राप्त झालेला नाही. तथापि विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर ,ता. सिन्नर यांनी आयोगास सादर केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, आयोगाने वर नमूद आदेशानुसार तहसिलदार, सिन्नर यांनी दि. १८/०१/२०२३ च्या आदेशान्वये पथक गठीत करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करणेबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार पथकाने दि. ०७/०२/२०२३ अन्वये तहसिलदार सिन्नर यांना अहवाल सादर केल असुन त्यामध्ये असे नमूद केले आहे की, तक्रारदार यांनी मागणी केलेल्या माहितीचा अभिलेख कक्षात शोध घेतला असता माहिती आढळ होत नसल्याने उपलब्ध करुन देता येऊ शकत नाही. मात्र तक्रारदारास

दि. ११/०७/२०२३ च्या पत्रान्वये स.नं. २५६/१/१(२७) चे ७/१२ उतारे व नोंदी पानांक १ ते ९३ ची माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तथापि तक्रारदारास त्यांनी मागणी केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन नसून व सदरची माहिती आढळ होत नसल्याने तहसिलदार, सिन्नर यांनी आयोगाच्या आदेशानुसार सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ अन्वये अभिलेख गहाळ प्रकरणी संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कार्यवाही करणे अपेक्षित होते. मात्र अशी कार्यवाही तहसिलदार, सिन्नर यांनी केलेली दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान तहसिलदार, तहसिल कार्यालय, सिन्नर, ता.सिन्नर यांनी आयोगाने द्वितीय अपील क्र. २१४७/२०२१/नाशिक संदर्भात दि. १५/०९/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार अभिलेख गहाळ प्रकरणी जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ अन्वये आवश्यक ती कार्यवाही करावी व त्यांची एक प्रत तक्रारदारास उपलब्ध करुन द्यावी.

२) आयोगाने द्वितीय अपिल क्र २१४७/२०२१/नाशिक संदर्भात दि १५/०९/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाचे जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, सिन्नर, ता.सिन्नर, जि. नाशिक यांनी पालन केले नाही. म्हणुन त्यांचे विरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा दि १५/०९/२०२२ रोजी कार्यरत असणारे जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, सिन्नर, ता.सिन्नर, जि. नाशिक यांनी आदेश प्राप्तीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत तक्रार क्रमांक १८८/२०२३/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

भा-३ आ. ४०३

0 6 MAR 2024